( ईन कॅमेरा )

**साक्षीदाराचे नाव कलम ३३(७) बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायद्याप्रमाणे गोपनीयतेकरिता वेगळ्या पाकीटमध्ये ठेवले.**

**(आरोपी जिल्हा मध्यवर्ती कारागृह, परभणी येथून दुरचित्रवाणीव्दारे हजर. व्हीडीओ कॅमेरा बंद व ऑडीओ सुरू ठेवून साक्ष नोंदविली.)**

(मुलाचे नांव, वय, पत्ता, नातेसंबंध याविषयी साक्षीदाराकडे प्राथमिक चौकशी केल्यावर, तो तर्कशुध्द आणि सुसंगतपणे उत्तर देत आहे. त्याने सांगितले की खोट बोलल्यामुळे पाप लागते. मुलाला खरे बोलण्याचे पावित्र्य माहित आहे म्हणून, मुलाचा ईन–कॅमेरा पुरावा त्याची स्थानिक भाषा मराठीमध्ये शपथेवर नोंदविण्यात येतो.)

सरकारपक्षातर्फे सरतपासणी **साक्षीदार क्र.०३**

मी याव्दारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – **एम. डी. ए. (पीडित मुलीचा भाऊ),**

वय – १४ वर्ष,

व्यवसाय – शिक्षण,

राहणार – मुंबई.

**<u>सरतपास सरकारपक्षातर्फे श्री. डी.यु. दराडे, सरकारी वकील</u>**

०१) मागच्या वर्षी आम्ही मामाच्या घरी ××××, ता. ××× येथे राहत होतो. घटनेच्या दिवशी आम्ही आईच्या घरामध्ये खेळत होतो. त्याठिकाणी बबलू (आरोपी) आला होता. त्याने माझे मामाची मुलगी ×× हिला दुकानावर चल असे म्हटला. ××ने त्याचा हात झटकला व पळून गेली. त्यानंतर, बबलूने माझी बहिण ×× हिला दुकानावर चल असे म्हणून उचलून नेले. मला वाटले की तो तिला दुकानावर घेवून जाणार. मला माझे बहिणीचा आवाज घरामधून आला. मी व माझा मित्र ××× पळत मामाच्या

*१४.०७.२०२६*

*विशेष न्यायाधीश, परभणी.*

घरामध्ये गेलो. त्याठिकाणी मी पाहिले की माझी बहिण झोपलेली होती व तिचे कपडे काढलेले होते व बबलू तिच्या अंगावर झोपलेला होता. आम्ही बबलूला ढकलले व ××ला ओढून घेतले. बबलूने आम्हाला शिवीगाळ केली. मला बबलू दाखविल्यास मी ओळखू शकतो. (आरोपीचा व्हीडीओ चालू करण्यास सांगितला. आरोपी दूरचित्रवाणीद्वारे हजर) दूरचित्रवाणीद्वारे दिसत असलेला व्यक्ती हा बबलू आहे असे साक्षीदाराने ओळखले.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. जे.एस. देशमुख, वकील</u>**

०२) मला दोन मामा आहेत. त्यांची नावे ××× व ××× अशी आहेत. मला एक मावशी आहे. मावशीच्या मुलाचे नाव ××× व मुलीचे नाव ××× आहेत. हे म्हणणे खरे आहे की ×××× येथे राहत असतांना आम्ही, दोन्ही मामा, मामी, मावशी, त्यांची मुले–मुली व आजी सोबत राहत होतो. हे म्हणणे खरे आहे की ××× मामा दारू पिवून भांडण करतो. हे म्हणणे खरे आहे की ××× मामा दारू पिवून आले की माझी आई व ××× मामा हे ××× मामासोबत भांडतात. हे मला माहित नाही की ××× मामा कोणासोबत दारू पितात.

०३) मी मोबाईल बघत असतो. मी मोबाईलवर गेम खेळतो. मी मम्मीच्या मोबाईलवर गेम खेळतो. हे म्हणणे खरे आहे की आजी, मावशी, मावशीचे मुले व माझी आई हे कामधंदा करत नाही व घरीच असतात. ×××× येथे माझी शाळेची वेळ सकाळी १०.०० ते दुपारी ०४.०० वाजेपर्यंत होती. शाळेमध्ये मी, ×× व ×× सोबत जाणे–येणे करत होतो. ××× शाळेमध्ये जात नाही. हे म्हणणे खरे आहे की ××× भोळा आहे व त्याला काही कळत नाही. मी संध्याकाळी ०५.०० ते ०६.०० दरम्यान

अभ्यास करत असतो. मी पोलीस स्टेशनला गेलो नव्हतो. मी ×××× येथे असतांना पोलीस आले होते व त्याची वेळ मला सांगता येणार नाही. मी ×××× येथून मुंबईला कधी गेलो हे सांगता येणार नाही. मुंबई येथून ××××ला जायचे आहे याबाबत मला आईने सांगितले होते. कशासाठी जायचे आहे हे मला मम्मीने सांगितले नाही. मी आज रोजी ×××× येथून आलो आहे. मुंबई येथून मी, माझी बहिण व आई आलो आहोत. आज न्यायालयात आल्यानंतर मी खाली ऑफीसमध्ये गेलो होतो व त्याठिकाणी पोलीसवाले बसले होते. हे म्हणणे खरे नाही की मला पोलीसांनी फाईल घेवून वाचून दाखविली व न्यायालयात साक्ष काय द्यायची याची माहिती दिली. घटनेच्या वेळी बबलूने कोणत्या रंगाचे कपडे घातले होते हे मी विसरलो. ××× कोणते कपडे घातले होते हे मला सांगता येणार नाही.

०४) पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता. पोलीसांना मी ××× बबलू याने हाताने उचलून नेले असे सांगितले होते. ते माझे जबाबामध्ये का नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. (सरकारी वकीलांनी सांगितले की फक्त ×× नाव हे बयानामध्ये नमुद नाही उचलून नेले याच्याबद्दल बयान दिले आहे.) मी पोलीसांना बयान देतेवेळी ×× किंचाळली असे बयान दिले. हे बयानामध्ये का नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. (सरकारी वकीलांनी सांगितले की बयानामध्ये ती तेथे ओरडल्यावर मी पळत जावून असे नमुद आहे.) मी पोलीसांना सांगितले होते की ××× सुध्दा माझेसोबत पळत आला होता ते माझे बयानात नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना सांगितले होते की मी मामाच्या घरामध्ये पळत गेलो. हे का नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना सांगितले

*१४.०७.२०२६*
*विशेष न्यायाधीश, परभणी.*

होते की ×× झोपलेली होती, तिचे कपडे काढलेले होते व बबलू तिच्या अंगावर झोपला होता. हे माझे बयानात का नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी बयान देतेवेळेस पोलीसांना सांगितले होते की मी बबलूला ढकलले व ××ला काढून घेतले. हे माझे बयानात का नमुद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. (सरकारी वकीलांनी सांगितले की बयानामध्ये बबलू भाऊला बाजूला केले असे नमुद आहे) (साक्षीदाराला आरोपीच्या वकीलांनी त्याचे पोलीसांना दिलेले बयान दाखविले. म्हणून बयानास **नि.पी.२४/पी.डब्ल्यू.०३** देण्यात आला.) या बयानामध्ये दोन सह्या आहेत. त्यापैकी एक सही माझी आहे व दुसरी सही ××ची आहे.

०५) हे म्हणणे खरे नाही की मला न्यायालयात काय साक्ष द्यायची याबाबत मला मम्मीने समजावून सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की मम्मीच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

वा.दा.ब.अ.क.केले. श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा./–

(आर.एम.सादराणी)

दिनांक – १४.०७.२०२६ विशेष न्यायाधीश, परभणी.